# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर




भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायु होवो !

## देशात जातनिहाय जनगणना कार्यक्रम केंद्र सरकारकडून जाहीर

नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- देशात होणाऱ्या आगामी जनगणनेबाबत केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. सरकारने जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यातील म्हणजेच लोकसंख्या जनगणनेसाठी ४० प्रश्नांची यादी जारी केली आहे. विशेष म्हणजे, यंदाची जनगणना अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या इतिहासात प्रथमच जातीनिहाय आकडेवारीही गोळा केली जाणार आहे. याशिवाय ही देशातील आतापर्यंतची सर्वात मोठी डिजिटल जनगणना असणार आहे. लडाख तसेच जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील बर्फाच्छादित भागांमध्ये १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत लोकसंख्या गणना केली जाणार आहे. घराघरात जाऊन गणना सुरू होण्यापूर्वी १७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या काळात नागरिकांना स्वतः ऑनलाइन फॉर्म भरण्याची सुविधाही उपलब्ध असेल. देशातील उर्वरित भागांमध्ये लोकसंख्या गणना पुढील वर्षापासून सुरू होणार आहे. यंदाच्या जनगणनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. यामुळे देशातील लोकसंख्येची रचना, सामाजिक स्थिती आणि इतर महत्त्वाची माहिती यांचा आधुनिक आणि सविस्तर डेटाबेस तयार होण्यास मदत होणार आहे.


(वर्ष ६५ वे अंक २०७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.१५ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# शेतकऱ्यांच्या हितासाठी सिंधू पाणी करार स्थगित करणे योग्यच

## स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींचे देशाला संबोधन



नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्षाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासीयांना संबोधित केले. राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात राष्ट्रीय सुरक्षा, आंतरराष्ट्रीय घडामोडी, भारताची आर्थिक प्रगती, सामाजिक कल्याण आणि सर्वसमावेशक विकास या मुद्द्यांवर भाष्य केले. दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या देशासोबतचा सिंधू पाणी करार स्थगित करणे हा राष्ट्रहितासाठी आणि आपल्या शेतकरी बांधवांसाठी योग्य निर्णय आहे, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले.

दहशतवादाविरोधातील भारताच्या कठोर धोरणावर बोलताना राष्ट्रपती मुर्मू यांनी स्पष्ट इशारा दिला की, 'दहशतवादी किंवा त्यांना पाठिंबा देणारे कुठेही दडून बसले तरी त्यांना परिणामांना भोगावे लागतील. ऑपरेशन सिंदूरनंतर दहशतवादी नेटवर्कवर अचूक हल्ला करण्याची भारतीय लष्कराची क्षमता दिसून आली आहे. तसेच दहशतवादाला आश्रय देणाऱ्या शेजारील देशाविरुद्ध सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा निर्णय भारताने आपल्या राष्ट्रीय हिताचे आणि शेतकऱ्यांचे रक्षण करण्यासाठी घेतला आहे.'

राष्ट्रपतींनी १४ ऑगस्ट या दिनाचेही महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, 'फाळणीच्या वेळी झालेल्या जातीय हिंसाचारामुळे लाखो लोकांना निर्वासित व्हावे लागले. असे असूनही त्यांनी आपली ओळख आणि संस्कृती जपून ठेवली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतमाता परकीय गुलामीतून मुक्त झाली आणि सर्व देशवासी स्वतंत्र भारताच्या भविष्याचे शिल्पकार बनले.'

'आपले संविधान लोकांच्या सहभागावर आधारित आहे, हीच आपल्या लोकशाहीची सर्वात मोठी ताकद आहे. निष्ठावंत विद्यार्थी, शिक्षक, वैज्ञानिक, अभियंते, डॉक्टर, आरोग्यसेवक, कामगार आणि अन्नदाता शेतकरी आपापल्या परिश्रमाने राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान देत आहेत, असे सांगत त्यांनी सर्वांचे आभार मानले.

जागतिक पातळीवरील अस्थिरता आणि युद्धाच्या वातावरणातही भारताची अर्थव्यवस्था प्रगती करत असल्याचे राष्ट्रपतींनी सांगितले. गेल्या दशकात २५ कोटींपेक्षा जास्त नागरिकांना दारिद्र्यरेषेतून बाहेर काढण्यात यश आल्याचे राष्ट्रपतींनी सांगितले. तसेच प्रधानमंत्री जन धन योजने अंतर्गत ५९ कोटींहून अधिक बँक खाती उघडण्यात आली असून, यात ३२ कोटींहून अधिक महिलांचा समावेश असल्याचेही त्या म्हणाल्या.

भारताच्या परराष्ट्र धोरणाविषयी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, भारताचे परराष्ट्र धोरण हे पूर्णपणे देशहितावर आधारित आहे. अनेक देशांशी केलेले मुक्त व्यापार करार आणि ग्लोबल साउथ देशांमध्ये भारताची आघाडीची भूमिका यांमुळे जागतिक स्तरावर देशाचा मान-सन्मान वाढला आहे असे म्हटले.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त ३०१ जवानांना शौर्य पुरस्कार जाहीर

केंद्र सरकारने २०२६ च्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलीस, अग्निशमन दल, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि कारागृह सेवेतील १,०५७ जवानांना शौर्य आणि सेवा पदके प्रदान करण्याची घोषणा केली आहे. यामध्ये ३०१ शौर्य पदके, ९२ राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदके आणि ६६४ गुणवत्तापूर्ण सेवा पदकांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, सीबीआयच्या २१ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या सेवेबद्दल राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. ३०१ शौर्य पदकांपैकी २७२ पोलीस कर्मचाऱ्यांना आणि २९ अग्निशमन दलाच्या जवानांना प्रदान करण्यात आले आहेत. यापैकी सर्वाधिक १९७ जवान डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवाया (नक्षलवाद) प्रभावित भागात तैनात आहेत. याव्यतिरिक्त, जम्मू आणि काश्मीरमधील ५१, ईशान्य भारतातील १२ आणि इतर प्रदेशांतील ४१ जवानांनाही शौर्य पदके प्रदान करण्यात आली आहेत. प्राण वाचवताना, मालमत्तेचे रक्षण करताना, गुन्हेगारी रोखताना किंवा गुन्हेगारांना पकडताना असाधारण शौर्य दाखवणाऱ्या जवानांना शौर्य पदके प्रदान केली जातात.

शासनाने ९२ जवानांना राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक प्रदान केले आहे. यामध्ये पोलीस सेवेतील ८३, अग्निशमन सेवेतील ४, नागरी संरक्षण आणि होमगार्डमधील ३, आणि सुधार सेवेतील २ जवानांचा समावेश आहे. हा सन्मान असाधारण आणि उत्कृष्ट सेवेसाठी दिला जातो. याव्यतिरिक्त, ६६४ जवानांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक प्रदान करण्यात आले आहे. यामध्ये पोलीस सेवेतील ६०६, अग्निशमन सेवेतील २८, नागरी संरक्षण आणि होमगार्डमधील १८, आणि सुधार सेवेतील १२ जवानांचा समावेश आहे. हे पदक कर्तव्यनिष्ठा आणि उत्कृष्ट सेवेसाठी दिले जाते.

२१ सीबीआय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदकही प्रदान करण्यात आले आहे. यापैकी ६ जणांना पीएसएम आणि १५ जणांना एमएसएम प्रदान करण्यात आले आहे. पीएसएम पुरस्कार विजेत्यांमध्ये शोभा दत्ता, मनोज बॅनर्जी, गिन्नी राणा, संजय कुमार सामल, रमेश चंद आणि मदनलाल धिमान यांचा समावेश आहे. यामध्ये एसपी, एएसपी, डीएसपी आणि एएसआय या पदांवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. एमएसएम पुरस्कार विजेत्यांमध्ये डीएसपी, इन्स्पेक्टर, सब-इन्स्पेक्टर, हेड कॉन्स्टेबल आणि कॉन्स्टेबल, तसेच कायदेशीर आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ते दिल्ली, मुंबई, लखनौ, कोलकाता, जयपूर, पाटणा, चंदीगड, मदुराई आणि बंगळूरु यासह सीबीआयच्या विविध युनिट्समध्ये कार्यरत आहेत. हे पुरस्कार तपास, कायदेशीर, तांत्रिक, प्रशासकीय आणि क्षेत्रीय स्तरांवर कार्यरत असलेल्या सीबीआय कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करतात.

## केंद्र सरकारची घटका भरली, सभागृहात सामोरे जायला घाबरता आणि आम्हाला पळपुटे म्हणता?-पृथ्वीराज चव्हाण

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- मोदी सरकारला २०२९ च्या निवडणुकीची खात्री नाही मला खात्री आहे, २०२९ मध्ये सत्ता बदल होणार हे नक्की आहे. मात्र, यासाठी विरोधकांनी एकत्र राहण गरजेचं असून केंद्र सरकारची घटका भरली आहे. अमित शाह हे आपल्या कार्यालयात येऊन बसत होते, मात्र संसदेत येत नव्हते. संसदेत मी १९ वर्षे काम केलं आहे. अमित शाह यांनी जाहीर केले असते की आम्ही सभागृहात बोलणार आहे तर आम्ही थांबलो असतो. सभागृहात सामोरे जायला घाबरता आणि आम्हाला पळपुटे म्हणता का? अमित शाह संसदेत आले नाहीत, उत्तर दिले नाही, अमित शाह नालायक गृहमंत्री आहेत, अशा शब्दात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी हल्ला चढवला.

पृथ्वीराज चव्हाण यांनी अमित शाह यांच्यावरही हल्ला चढवला. ते म्हणाले, अमित शाह संसदेच्या अधिवेशन काळात सभागृहात आलेच नाही. सभागृहाला सामोरे जायला तुम्ही घाबरता हेच यातून सिद्ध होते. अमित शहा सभागृहात आले नाही हा घटनेचा, सभागृहाचा आणि जनतेचा अपमान आहे, तुम्ही नालायक गृहमंत्री आहात. पंतप्रधान मोदी यांचं जगभरात हासे होत आहे, कोणता पुरस्कार देणार असाल, तर मोदी येतील अस परराष्ट्र मंत्रालयाकडून इतर देशांना सांगितल जातंय. एपस्टीन फाईलमध्ये अनिल अंबानी, पंतप्रधान मोदी, परराष्ट्र खात्यातील एक अशी तिघांची नावे आहेत.

पृथ्वीराच चव्हाण म्हणाले की, शिक्षण आणि परीक्षेबद्दल जे आंदोलन झालं ते न भूतो ना भविष्यती असं होत, केंद्र सरकार आता माघारीच्या मोडमध्ये गेलं आहे. प्रधानमंत्री मोदी आता व्हिडिओ करत आहे, मोदी सरकार आता पॅनिक परिस्थितीत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री पद ज्यांना दिल आहे त्यांनी आधीच अकलेचे तारे तोडले आहेत. शिक्षण आणि परीक्षा बदलेल असा व्यक्ती मला मोदी सरकारमध्ये दिसत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच नावही आघाडीवर होतं, पण परिस्थिती बदलली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांचे नाव घेतले जाते, पण राज्यात टीईटी पेपर फुटला आहे. त्यामुळे त्यांना काही आम्ही स्वीकारणार नाही, असे पृथ्वीराच चव्हाण म्हणाले. मात्र, आम्हाला चांगला शिक्षणमंत्री पाहिजे आहे, तुमच्या पक्षात नसेल तर इतर पक्षातला घ्या, असेही त्यांनी सांगितले. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा नैतिक जबाबदारी स्वीकारून नाही तर विद्यार्थ्यांच्या दबावामुळे आला असल्याचेही ते म्हणाले.

## ३६ हजार कंपन्या बंद ही बाब महाराष्ट्रासाठी निश्चितच भूषणावह नाही-शरद पवार

पुणे/मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- पुण्यातील चाकण औद्योगिक वसाहतीतील तब्बल २० कंपन्यांनी मूलभूत सुविधांच्या अभावामुळे स्थलांतर करण्याचा निर्णय घेतल्याची बाब समोर आली आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी राज्य सरकारवर चिंता व्यक्त करत जोरदार निशाणा साधला आहे. ''पायाभूत सुविधांच्या अभावामुळे उद्योगांचे स्थलांतर होणे किंवा ते बंद पडणे हे महाराष्ट्रासाठी निश्चितच भूषणावह नाही,'' अशा शब्दांत पवारांनी राज्य सरकारला खडे बोल सुनावले आहेत.

शरद पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, वाहतूक कोंडी, प्रदूषण, पाणी, वीज आणि रस्त्यांची दुरवस्था यांसारख्या गंभीर समस्यांमुळे चाकणमधील तब्बल २० कंपन्यांनी स्थलांतराचा निर्णय घेतला आहे. या कंपन्यांमध्ये सुमारे २,००० हून अधिक कामगार काम करत असून, त्यांच्या रोजगारावर आता संकट ओढवले आहे. हे उद्योग स्थलांतरित होऊ नयेत आणि राज्याची औद्योगिक ताकद कायम राहावी, यासाठी सरकारने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

केवळ चाकणचाच मुद्दा नव्हे, तर शरद पवारांनी राज्यातील एकूण औद्योगिक स्थितीवरही बोट ठेवले. नुकत्याच झालेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात खासदार राजाभाऊ वाजे यांनी विचारलेल्या प्रश्नाचा दाखला त्यांनी दिला. केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या ५ वर्षांत महाराष्ट्रातील तब्बल ३६,२११ खासगी कंपन्या बंद पडल्या आहेत. मात्र, या कंपन्या बंद झाल्यानंतर किती कामगारांच्या नोकऱ्या गेल्या आणि त्यांना पुरेसा मोबदला मिळाला का? याची कोणतीही माहिती सरकारकडे उपलब्ध नसणे, ही अत्यंत धक्कादायक बाब असल्याचे पवार म्हणाले.

## कॉकरोच वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावला गेला; सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्याकडून पुन्हा खुलासा

नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी आपल्या कॉकरोच वक्तव्यावर पुन्हा एकदा स्पष्टीकरण दिलं आहे. त्यांनी म्हटले आहे की, त्यांच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावला गेला आणि देशातील तरुणांची दिशाभूल करण्यासाठी त्याचा गैरवापर करण्यात आला. सोशल मीडियावर न्यायालयाच्या कामकाजाचे अपूर्ण व्हिडिओ क्लिप्स प्रसारित होत असल्याबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली. डीडी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सांगितले की, आजकाल न्यायालयाच्या कामकाजाचे व्हिडिओ क्लिप्स सोशल मीडियावर चुकीच्या पद्धतीने शेअर केले जात आहेत. त्यांच्यासोबत जे घडले ते अत्यंत दुर्दैवी होते आणि त्यांच्या वक्तव्याला ज्या प्रकारे सादर केले जाईल, त्याची त्यांनी कधी कल्पनाही केली नव्हती, असे ते म्हणाले.

सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, ''माझ्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावला गेला आणि त्याचा गैरवापर करण्यात आला. जे मी म्हटलेच नव्हते, ते मी म्हटल्यासारखे सादर केले गेले. विशेषतः देशातील तरुणांची दिशाभूल करण्याचा हा एक घोर आणि द्वेषपूर्ण प्रयत्न होता. यात सामील असलेल्या लोकांबद्दल मी अशा गोष्टींची कल्पनाही करू शकत नाही.''

१५ मे २०२६ रोजी, सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बनावट पदव्या असलेल्या काही लोकांची तुलना कॉकरोच केली. ते म्हणाले की, असे लोक सोशल मीडियाचा वापर करून किंवा आरटीआय कार्यकर्ते असल्याचे भासवून व्यवस्थेला लक्ष्य करतात. या वक्तव्यामुळे तरुणांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली, ज्यामुळे कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) या उपहासात्मक ऑनलाइन चळवळीचा उदय झाला. या संघटनेने त्यानंतर दिल्लीतील जंतर मंतर येथे महिनाभर नीट-यूजी पेपरफुटीविरोधात आंदोलने केली. २० जुलै रोजी, आंदोलक आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला, ज्यात दोन्ही बाजूंचे अनेक जण जखमी झाले. या आंदोलनांनंतर, तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला.

मुलाखतीदरम्यान, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी माध्यमांना न्यायालयाच्या कामकाजाचे वार्तांकन करताना जबाबदारीने वागण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, प्रत्येक नागरिकाला समाजात सलोखा राखण्याचा केवळ अधिकारच नाही, तर ते त्याचे घटनात्मक कर्तव्यही आहे. त्यांनी सांगितले की, एखादी व्यक्ती सोशल मीडिया, प्रिंट मीडिया किंवा इतर कोणत्याही माध्यमात कार्यरत असो, किंवा एक सामान्य नागरिक असो, प्रत्येकाला जबाबदाऱ्यांसोबतच अधिकारही असतात. त्यांनी सांगितले की, अधिकार महत्त्वाचे असले तरी, व्यक्तींमध्ये आपली कर्तव्ये पार पाडण्याची क्षमताही असली पाहिजे. सरन्यायाधीशांनी सर्व लोकांना समाजात सलोखा टिकवून ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

## वाहेगुरूंकडून दिव्य आज्ञा मिळाली, सुखबीर सिंग बादल यांच्यावर हल्ला करणाऱ्या निहंगचा दावा

नांदेड दि.१४ (प्रतिनिधी)- शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीर सिंग बादल यांच्यावर गुरुवारी नांदेडमधील गुरुद्वारा मत्ता साहिब देवनजी येथे हल्ला झाला. जसपाल सिंग या निहंग शीख व्यक्तीने बादल यांच्यावर किरपाणीने हल्ला केला. या हल्ल्याबाबत पोलिसांना सिंगने माहिती दिली आहे. ''नांदेडच्या गुरुद्वारात प्रार्थना करत असताना वाहेगुरूंकडून दिव्य आज्ञा मिळाली होती'', असे जसपाल सिंग पोलिसांशी बोलताना म्हणाला.

सुखबीर बादल गुरुद्वारात पायऱ्या उतरत असताना त्यांच्यावर हल्ला झाला. इतर तिघा जणांसोबत तिथं उभा असलेला जसपालने किरपाणी घेऊन बादल यांच्या दिशेने धावला, व हल्ला केला, यात बादल यांच्या हाताला दुखापत झाली आहे. दरम्यान, या घटनेनंतर संशयित आरोपी जसपाल सिंगला अटक करण्यात आली असून, चौकशीसाठी नांदेड पोलीस मुख्यालयात नेण्यात आले. चौकशीदरम्यान, जसपाल सिंगने पोलिसांना माहिती दिली. जसपालने २०२३ मध्ये संन्यास घेतल्याचे पोलिसांना सांगितले. पुण्यात त्याची पत्नी आणि मुलगी आहे. तो नांदेडमध्ये निहंग सेवेकरी असून, निहंग होण्यापूर्वी तो पेशाने वकील होता आणि मुंबईतील एका कॉर्पोरेट फर्ममध्ये काम करत होता. दरम्यान, जसपाल सिंगने एकट्याने हे कृत्य केले असून, त्याला बाह्यमदत मिळाली नसल्याचे जसपाल सिंगची चौकशी करणाऱ्या एका अधिकाऱ्याने बोलताना सांगितले.

## दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात ५ ते १० हजार कोटी जमा होणार-कृषिमंत्री

अकोला दि.१४ (प्रतिनिधी)- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत 'ॲग्रीस्टॅक' पोर्टलच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांची पडताळणी केली जात आहे. शासनाकडे पैसा उपलब्ध असून येत्या दोन ते चार दिवसांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात पाच ते १० हजार कोटी रुपये जमा केले जाणार आहेत, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज वाशीम येथे दिली. वाशीम जिल्हा दौऱ्यावर आले असतांना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कर्जमुक्ती योजनेवर महत्त्वपूर्ण भाष्य केले.

कृषिमंत्री म्हणाले, ''राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली. योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांची 'ॲग्रीस्टॅक' पोर्टलवर नोंदणी आवश्यक असून लाभार्थ्यांनी आपला विशिष्ट क्रमांक व आधार क्रमांक प्रमाणीकरण करून घ्यावा. सध्या योजनेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती दिली जात आहे.''

## ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याची सरकारची नियतच नाही-विजय वडेट्टीवार

चंद्रपूर दि.१४ (प्रतिनिधी)- ओबीसी समाजाला वारंवार आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्ष निर्णय घेण्याची वेळ येताच त्यांच्या हक्कांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप काँग्रेस विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. दुसऱ्या टप्प्यातील जनगणनेच्या राजपत्रात ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना नसल्याने सरकारची ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याची नियतच नसल्याची टीका केली आहे. वडेट्टीवार यांनी चंद्रपूर येथे माध्यमांशी बोलताना केंद्र आणि राज्य सरकारचा समाचार घेतला. ओबीसी समाजाची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती स्पष्ट होण्यासाठी जातनिहाय जनगणना होणे आवश्यक असल्याचे या संदर्भात सांगण्यात आले. समाजाची नेमकी लोकसंख्या आणि विविध घटकांची सद्यस्थिती उपलब्ध झाल्यास त्यानुसार कल्याणकारी योजना, आरक्षणाचे धोरण आणि विकासात्मक निर्णय अधिक परिणामकारकपणे घेता येऊ शकतात. त्यामुळे जातनिहाय आकडेवारी ही केवळ जनगणनेपुरती मर्यादित बाब नसून ओबीसींच्या हक्कांशी संबंधित महत्त्वाचा विषय असल्याचे नमूद करण्यात आले. ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेबाबत सरकारकडून वेळोवेळी आश्वासने देण्यात आली. मात्र, जनगणनेच्या प्रत्यक्ष प्रक्रियेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना ठेवण्यात आला नसल्याने या आश्वासनांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकारला ओबीसींची जातनिहाय जनगणना करायची असेल, तर त्यासाठी जनगणनेच्या प्रक्रियेत आवश्यक ती स्पष्ट आणि ठोस तरतूद करणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले.




# भारतीय स्वातंत्र्याची वाटचाल

१५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. दीडशे वर्षे ब्रिटीशांच्या पारतंत्र्यात असलेल्या भारताच्या दृष्टीने तो दिवस एक आनंद, मंगलमय ठरला. आज देशाला स्वतंत्र होऊन ७९ वर्षाचा कालावधी लोटला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते आतापर्यंत देशाने प्रगतीची अनेक पावले उचलली आहेत. आपला देश प्रगतीच्या दृष्टीने स्पर्धात्मक पावले उचलून विकासाची झेप घेत आहे. तरी सुद्धा सद्यःस्थितीला 'काल'चा काल अजूनही संपलेला नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही तत्त्वप्रणाली स्वीकारुन आपण देशाची सत्ता लोकांच्या हाती सोपविली. जगातील काही देशांपुढे विकासाची आणि राज्य व्यवस्थेची जी आव्हाने उभी आहेत ती आव्हाने आपल्या समोरही आहेत. बहुभाषक, बहुसांस्कृतिक आणि बहुवंशीय समाज असलेल्या भारताने विविधेतील एकता टिकवून ठेवण्याचे प्रभावी दर्शन संपूर्ण जगाला घडविले आहे. आपण आपल्या पाच दशकांच्या वाटचालीत कृषी, औद्योगिक, तांत्रिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक व अन्य अनेक क्षेत्रात अभिमानास्पद प्रगती केली असली, तरी वाढती लोकसंख्या बेरोजगारी, बहुसंख्य लोकांतील दारिद्र्य या समस्या सोडविण्यात अद्यापही आपल्याला म्हणावे तसे यश लाभलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे झाली तरी लक्षावधी लोकांना पुरेसे अन्न, रहायला घर आणि पिण्यासाठी पाणी व किमान आरोग्य सेवाही अनेक जणांना पुरविण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत. चांगले अन्न, चांगले शिक्षण आणि चांगले पोषण यापासून जर या देशाची बालके वंचित राहत असतील तर नुकसान फक्त त्या बालकांचे, त्या कुटुंबाचे असणार नाही तर देशाचे मनुष्यबळच कमकुवत होण्याचा तोटा त्यामुळे होणार आहे आणि ही अपरिमीत हानी देशाच्या विकासाला अडथळा ठरु शकते. आपण हे वास्तव्य बदलले पाहिजे. देशाचे राजकारण 'धर्मनिरपेक्ष' आणि जातीयवादी पक्षांमध्ये विभागलेले दिसते. पक्ष अथवा आघाड्यांनी धर्मनिरपेक्षता, समावेशकता आणि एकात्मता यांना आपल्या कार्यक्रम पत्रिकेत स्थान दिलेले नाही. त्यांना आपले मतदार निवडून येत नाहीत यापेक्षा उलटा विचार करणे म्हणजे भारतीय मतदारांच्या लोकशाही विषयक शहाणपणावर अविश्वास दाखविल्यासारखे होईल. दुर्दैव्याची गोष्ट म्हणजे आपल्या लोकशाही राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले आहे. चांगले घहेल अशी अपेक्षा तरी कशी करता येईल? आणि याला जबाबदार आपल्या देशातील राजकीय पक्षच आहेत. सत्ता व स्वार्थासाठी सुरु असलेली राजकीय स्पर्धा देशाला घातक ठरणार असूनही संकुचित प्रवृत्ती बाजूला ठेवून भारताने आता वेगवान, समतोल स्वरुपाच्या सामाजिक आर्थिक प्रगतीकडे वाटचाल करायला हवी. विकासाच्या आकांक्षा वाढल्या आहेत पण लोकांची विकासाची वाढती भूक समजून घेण्यात सरकारची यंत्रणा कमकुवत ठरत आहे. जनतेच्या मागण्या अगदी साध्या आणि मूलभूत, अशाच आहेत. त्यांना हवे आहेत चांगले रस्ते, पुरेसे पिण्याचे पाणी, आरोग्य शिक्षणाच्या सुविधा व शेतकऱ्यांना पुरेसा आणि खात्रीपूर्वक वीज पुरवठा. आपण हे वास्तव बदलले पाहिजे आणि ते निश्चित बदलू शकतो. किमान विकासाला आवश्यक असणारी नैसर्गिक साधन संपत्ती भारताकडे अजिबात कमी नाही. बुद्धिमान आणि परिश्रम करणाऱ्या लोकांची आपल्याकडे वणवा नाही. त्यासाठी येथील विविध वर्गातील समाजघटकांनी, नागरिकांनी, प्रेरणादायी अशी राष्टीय दूरदृष्टी स्वीकारुन, बलवत्तर हेतू बाळगून जी राष्ट्रीय ध्येये ठरतील ती गाठण्याचा एकत्र निर्धाराने कृतीप्रवण होण्याची गरज आहे. अर्थसंकल्पातील तरतुदींचा बराच मोठा भाग भ्रष्टाचाराच्या वाटेने निघून जातो. त्याला रोखण्यासाठी सत्ताधारी पक्ष व इतर राजकीय पक्षांनी प्रामाणिकणे कठोर प्रयत्न केले पाहिजेत. भारताच्या प्रदीर्घ इतिहासात धर्मनिरपेक्ष विचारांनी भारतीय अस्मितेचे पोषण केले आहे. या परंपरेने भारताच्या प्रत्येकाच्या परंपरा, रिवाज, श्रद्धा याच्याविषयी सहिष्णू भूमिका आणि त्यांचा सन्मान ठेवण्याची शिकवण दिली. परस्पर सामंजस्य आणि सहिष्णुता यामुळे सदिच्छा आणि सहकार्य निर्माण होते. त्याची परिणती आपले राष्टीय ऐक्य दृढ होण्यात होते. धर्मनिरपेक्षता ही स्वातंत्र्यानंतर आपण आयात केलेली विदेशी संकल्पना नाही. भारताची अस्मिता आणि संस्कृतीचा तो अविभाज्य घटक आहे. नव्या शकात भारताच्या सर्वांगिण विकासाच्या अनेक संधी आहेत. त्याचा वापर करण्यासाठी सर्व राजकीय पक्ष व देशातील नागरिकांनीही कटिबद्ध राहण्याचा निर्धार आजच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनी केला पाहिजे.

## भारतीय स्वातंत्र्य दिन

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा आम्हा असे मोठा गर्व
घर,घर तिरंगा फडकवून साजरा करू आपण सर्व
भारत भूमी असे जगी खूप महान
गुण गाती जगभर मोठे आणि लहान
भारत माता की जय वंदे मातरम घोषणा
यांनीच आम्हा मिळते सदैव राष्ट्रनिष्ठा प्रेरणा
स्वातंत्र्यवीरांचे स्मरण स्वातंत्र्यवीरांची आठवण
हृदयात आमच्या असे स्मृतींची साठवण
तिरंग्याचा मान, सन्मान तिरंगा आमची शान
तिरंग्याचा असे आम्हा सार्थ,सार्थ अभिमान
देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचा संकल्प करू सारे
भारत माता की जय चे भारतभर गुंजत आहे नारे...

– धोंडीरामसिंह राजपूत

# भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये

**१५ ऑगस्ट** हा प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्राभिमान, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना जागविणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटिशांच्या दीर्घकालीन वसाहतवादी राजवटीतून स्वातंत्र्य प्राप्त केले आणि एका स्वतंत्र राष्ट्राच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला. या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजारोहण, राष्ट्रगीत, देशभक्तिपर गीते आणि विविध कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या मागे अनेक पिढ्यांचा संघर्ष, असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि कोट्यवधी भारतीयांच्या स्वराज्याच्या आकांक्षेची प्रेरणा आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा इतिहासाचे स्मरण करण्याचा दिवस तर आहेच; पण त्याचबरोबर स्वातंत्र्याचा अर्थ समजून घेण्याचा, संविधानिक मूल्यांचे महत्त्व जाणून घेण्याचा आणि स्वतंत्र भारताच्या भविष्यासाठी आपली जबाबदारी निश्चित करण्याचा दिवस आहे.

भारताला मिळालेले स्वातंत्र्य सहजासहजी प्राप्त झालेले नव्हते. ब्रिटिश सत्तेच्या काळात भारतीयांना अनेक प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागले. या परिस्थितीत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष वाढत गेला. स्वराज्य आणि स्वाभिमानाची भावना भारतीय समाजात दृढ होत गेली. १८५७ चा उठाव हा ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

पुढील काळात भारतीय राष्ट्रीय चळवळीला संघटित स्वरूप प्राप्त झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी संघर्ष केला. स्वदेशी आणि बहिष्काराच्या चळवळीने भारतीयांमध्ये आत्मनिर्भरतेची भावना निर्माण केली. या काळात सामाजिक सुधारणांच्या चळवळीनेही राष्ट्रनिर्मितीला महत्त्वपूर्ण आधार दिला. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, स्त्रीमुक्ती आणि सामाजिक समतेसाठी केलेले कार्य भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरले. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि शिक्षणासाठी केलेले कार्य तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समानता आणि मानवी प्रतिष्ठेसाठी केलेला संघर्ष यामुळे स्वातंत्र्याची संकल्पना केवळ परकीय सत्तेपासून मुक्तीपुरती राहिली नाही, तर सामाजिक न्यायाशीही जोडली गेली.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून गांधीजींनी सामान्य नागरिकांना स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी करून घेतले. असहकार आंदोलन, मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलन या विविध टप्प्यांतून ब्रिटिश सत्तेला भारतीय जनतेच्या सामूहिक शक्तीची जाणीव झाली.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांचे योगदानही अविस्मरणीय आहे. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद आणि असंख्य क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. महिलांनीही या संघर्षात मोठ्या धैर्याने सहभाग घेतला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याची गाथा ही संपूर्ण समाजाच्या सामूहिक संघर्षाची गाथा आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; परंतु स्वातंत्र्याबरोबर फाळणीची शोकांतिका देशाच्या वाट्याला आली. भारत आणि पाकिस्तान अशी विभागणी झाली आणि मोठ्या प्रमाणावर हिंसाचार व विस्थापन झाले. स्वातंत्र्याचा आनंद आणि फाळणीचे दुःख या दोन्हींच्या छायेत स्वतंत्र भारताचा जन्म झाला. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा आनंदाचा दिवस असला तरी तो राष्ट्रीय एकात्मता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारीही आपल्याला स्मरवून देतो.

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर राष्ट्रनिर्मितीची मोठी आव्हाने होती. गरिबी, अशिक्षितता, बेरोजगारी, आरोग्याच्या समस्या आणि आर्थिक मागासलेपण यांवर मात करणे आवश्यक होते. या परिस्थितीत भारताने लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले आणि भारत प्रजासत्ताक बनला. संविधान हे स्वतंत्र भारताच्या राष्ट्रजीवनाचे मूलभूत अधिष्ठान ठरले. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. ही मूल्ये केवळ संविधानातील शब्द नाहीत;



ती भारतीय लोकशाहीच्या यशाची मूलभूत तत्त्वे आहेत.

'न्याय' हे संविधानिक मूल्य भारतीय राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे ध्येय आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाशिवाय स्वातंत्र्याला पूर्ण अर्थ प्राप्त होत नाही. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे, भेदभाव दूर करणे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी देणे ही न्यायाची खरी कसोटी आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने कायदे आणि धोरणांच्या माध्यमातून सामाजिक न्यायाच्या दिशेने अनेक पावले उचलली आहेत. मात्र सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशी करण्यासाठी संविधानिक मूल्यांचे आचरण समाजाच्या प्रत्येक स्तरावर होणे आवश्यक आहे.

'स्वातंत्र्य' हे भारतीय संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे मूल्य आहे. विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य नागरिकांना देण्यात आले आहे. परंतु स्वातंत्र्याचा अर्थ मनमानी नव्हे. आपल्या स्वातंत्र्याचा वापर करताना इतरांच्या अधिकारांचा आणि प्रतिष्ठेचा आदर करणे आवश्यक आहे. आजच्या सामाजिक माध्यमांच्या युगात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे. खोटी माहिती, अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि समाजात तेढ निर्माण करणारा मजकूर यामुळे लोकशाही आणि सामाजिक सलोख्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे स्वातंत्र्यासोबत विवेक आणि जबाबदारी आवश्यक आहे.

'समता' हे संविधानिक मूल्य भारतीय समाजासाठी विशेष महत्त्वाचे आहे. जात, धर्म, लिंग किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभाव होऊ नये, ही संविधानाची स्पष्ट भूमिका आहे. भारतीय समाजाच्या इतिहासात जातीय विषमता आणि सामाजिक भेदभावाची मोठी परंपरा राहिली आहे. त्यामुळे संविधानाने कायदेशीर समानतेबरोबर सामाजिक न्यायालाही महत्त्व दिले. आज कायद्याच्या दृष्टीने समानता प्रस्थापित झाली असली तरी सामाजिक व्यवहारात समानता पूर्णपणे रुजविण्याचे काम अद्याप बाकी आहे. स्त्री-पुरुष समानता, जातीय भेदभावाचा अंत आणि वंचित घटकांना समान संधी यांसाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. 'बंधुता' हे भारतीय संविधानातील अत्यंत सुंदर आणि आवश्यक मूल्य आहे. भारताची विविधता ही त्याची मोठी ताकद आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ आणि संस्कृती असूनही भारतीय समाज एका राष्ट्रीय भावनेने जोडलेला आहे. ही एकता टिकविण्यासाठी परस्पर आदर, सहिष्णुता आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव आवश्यक आहे. मतभेद असणे हे लोकशाहीचे लक्षण आहे; मात्र मतभेदांचे रूपांतर वैरात होऊ नये. दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, विविधतेचा स्वीकार करणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही बंधुतेची खरी भावना आहे.

भारतीय लोकशाहीचे यश हे संविधानिक मूल्यांच्या प्रत्यक्ष आचरणावर अवलंबून आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणूक आणि मतदान नव्हे. नागरिकांचा सहभाग, प्रश्न विचारण्याचा अधिकार, सत्तेवर नियंत्रण, कायद्याचे राज्य आणि विरोधी मतांचा आदर हे लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा आधार असला तरी सुजाणपणे मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. जात, धर्म, पैसा किंवा क्षणिक भावनांपेक्षा सार्वजनिक हिताचा विचार करून मतदान करणारा नागरिक लोकशाही अधिक मजबूत करतो.

संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार दिले असले तरी मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. संविधानाचा आदर करणे, राष्ट्रीय एकता आणि अखंडता जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे ही नागरिकांची कर्तव्ये आहेत. आज स्वातंत्र्यदिन साजरा करताना अधिकारांसोबत कर्तव्यांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. अधिकारांचा आग्रह धरणाऱ्या नागरिकांनी आपल्या कर्तव्यांपासून दूर राहणे ही लोकशाहीसाठी योग्य बाब नाही.

शिक्षण हे संविधानिक मूल्ये रुजविण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या अधिकारांची जाणीव होते, विवेक विकसित होतो आणि सामाजिक प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची क्षमता प्राप्त होते. शाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी तयार न करता संविधान, लोकशाही, समानता, बंधुता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे संस्कार दिले पाहिजेत. प्रश्न विचारणारा, विचार करणारा, विविध मतांचा आदर करणारा आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारणारा विद्यार्थी हा भविष्यातील सक्षम नागरिक ठरतो.

आजच्या भारतात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यलढ्यातील युवकांनी देशासाठी बलिदान दिले. आजच्या युवकांनी ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान द्यावे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि नवउद्योजकता यांसारख्या क्षेत्रांत युवकांसमोर मोठ्या संधी आहेत. मात्र तंत्रज्ञानासोबत विवेक, नैतिकता आणि सामाजिक संवेदनशीलता असणेही आवश्यक आहे. राष्ट्राचे भविष्य केवळ तंत्रज्ञानाच्या प्रगतीत नसून सक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्यात आहे.

महिलांचे सक्षमीकरण हे संविधानिक समतेचे महत्त्वाचे प्रतीक आहे. महिलांनी शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि राजकारण या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तरीही महिलांवरील हिंसा, भेदभाव, असमान संधी आणि आर्थिक परावलंबित्व यांसारखे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. स्त्रीला समान प्रतिष्ठा, समान संधी आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही आधुनिक भारताची गरज आहे. घरापासून कार्यक्षेत्रापर्यंत समानतेची संस्कृती रुजविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

ग्रामीण भारत आणि शेतकरी हे देशाच्या विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. शेती, ग्रामीण रोजगार, जलसंधारण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणाशिवाय भारताचा सर्वांगीण विकास शक्य नाही. हवामान बदल, पाण्याची कमतरता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यांसारखी आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि तंत्रज्ञानाच्या समान संधी निर्माण करणे हे सामाजिक न्यायाचेच एक रूप आहे. विकासाची फळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली तरच स्वातंत्र्याचा अर्थ अधिक व्यापक होईल.

पर्यावरणसंवर्धन हे आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे नागरिक कर्तव्य आहे. पाणी, हवा, जंगल आणि जैवविविधता यांचे संरक्षण केवळ वर्तमानासाठी नव्हे तर भावी पिढ्यांसाठी आवश्यक आहे. पाण्याची बचत, वृक्षसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि सार्वजनिक परिसराची स्वच्छता यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान दिले पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन साधणे ही आजच्या राष्ट्रनिर्मितीची गरज आहे. निसर्गाचा ऱ्हास करून साधलेला विकास दीर्घकाळ टिकणारा ठरू शकत नाही.

आज भारत विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती आणि डिजिटल क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करीत आहे. या प्रगतीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानामुळे सुविधा वाढत असल्या तरी डिजिटल दरीही लक्षात घेतली पाहिजे. ग्रामीण आणि वंचित समाजघटकांना डिजिटल साधनांची उपलब्धता, माहिती आणि कौशल्ये मिळाली तर तंत्रज्ञान सामाजिक सक्षमीकरणाचे प्रभावी साधन बनू शकते.

देशभक्तीचा अर्थही आज नव्याने समजून घेण्याची गरज आहे. देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंग्याला सलाम करणे किंवा घोषवाक्ये देणे नव्हे. आपल्या कामात प्रामाणिक राहणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरण जपणे, गरजू व्यक्तीला मदत करणे आणि सामाजिक भेदभावाला विरोध करणे हीदेखील देशभक्तीचीच रूपे आहेत. सीमांचे रक्षण करणारा सैनिक जसा राष्ट्रसेवा करतो, त्याचप्रमाणे प्रामाणिकपणे काम करणारा शिक्षक, शेतकरी, वैज्ञानिक, डॉक्टर, कामगार आणि प्रत्येक जबाबदार नागरिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देत असतो.

भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये यांचा संबंध अतूट आहे. स्वातंत्र्यलढ्याने भारताला परकीय सत्तेपासून मुक्त केले, तर संविधानाने त्या स्वातंत्र्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची दिशा दिली. स्वातंत्र्याने आपल्याला स्वतःचे शासन करण्याचा अधिकार दिला; संविधानाने त्या शासनाची लोकशाही चौकट निश्चित केली. स्वातंत्र्याने राष्ट्रीय अस्मिता निर्माण केली; संविधानाने प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेला समान स्थान दिले. म्हणूनच स्वातंत्र्यदिनाचा खरा उत्सव हा संविधानिक मूल्यांचा सन्मान आणि त्यांच्या आचरणातूनच पूर्ण होतो.

आज भारत स्वातंत्र्याच्या ऐंशीव्या वर्षात प्रवेश करीत असताना मागील प्रवासाचा अभिमान बाळगतानाच पुढील वाटचालीचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, उद्योग, शिक्षण आणि लोकशाहीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक विषमता, बेरोजगारी, गरिबी, पर्यावरणीय संकट, शिक्षण आणि आरोग्यातील असमानता यांसारखी आव्हाने अद्याप आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक न्याय, तंत्रज्ञानासोबत मानवी संवेदना आणि अधिकारांसोबत कर्तव्य यांचा समतोल साधणे आवश्यक आहे.

या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण ज्ञात-अज्ञात सर्व स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन करूया. त्यांच्या त्यागाचे स्मरण करून संविधानिक मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प करूया. न्यायासाठी उभे राहूया, स्वातंत्र्याचा जबाबदारीने वापर करूया, समानतेचा स्वीकार करूया आणि बंधुतेची भावना वाढवूया. जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला सन्मान देऊया. लोकशाहीतील मतभेदांचा आदर करूया आणि संवादाची संस्कृती मजबूत करूया.

स्वातंत्र्य ही आपल्या पूर्वजांनी दिलेली अमूल्य देणगी आहे; परंतु ती पुढील पिढ्यांसाठी अधिक समृद्ध करून ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. स्वातंत्र्यवीरांनी परकीय सत्तेच्या बेड्या तोडल्या; आज आपल्याला अज्ञान, विषमता, सामाजिक द्वेष, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या नव्या आव्हानांवर मात करायची आहे. ही लढाई शस्त्रांची नसून ज्ञानाची, विवेकाची, प्रामाणिकपणाची आणि सामाजिक बांधिलकीची आहे.

तिरंगा जेव्हा आकाशात डौलाने फडकतो, तेव्हा त्याच्याकडे पाहताना आपल्या मनात केवळ राष्ट्राभिमान नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्याची जाणीवही निर्माण झाली पाहिजे. त्या तिरंग्यात स्वातंत्र्यवीरांचा त्याग, संविधाननिर्मात्यांची दूरदृष्टी आणि कोट्यवधी भारतीयांच्या भविष्याची स्वप्ने सामावलेली आहेत. त्या स्वप्नांना साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक आहे.

म्हणूनच या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण असा भारत घडविण्याचा संकल्प करूया, जिथे प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळेल, प्रत्येक युवकाला सन्मानजनक रोजगाराची संधी मिळेल, प्रत्येक महिलेला समानता आणि सुरक्षितता मिळेल, प्रत्येक शेतकऱ्याला सन्मानाने जगता येईल, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला समान संधी मिळेल आणि कोणत्याही व्यक्तीला जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीमुळे अन्याय सहन करावा लागणार नाही. असा भारत निर्माण करणे हीच संविधानिक मूल्यांची खरी अंमलबजावणी ठरेल.

भारतीय स्वातंत्र्य ही केवळ भूतकाळातील ऐतिहासिक घटना नाही; ती वर्तमानातील जबाबदारी आणि भविष्याची आशा आहे. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून भारतीय लोकशाहीचे नैतिक अधिष्ठान आहे. स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्यांचा संगमच भारताच्या राष्ट्रजीवनाला अर्थ देतो. म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना संविधानाचा सन्मान, लोकशाहीवरील विश्वास, सामाजिक समतेची बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना आपल्या मनात दृढ करूया. स्वातंत्र्य मिळवणे हा आपल्या पूर्वजांचा महान पराक्रम होता; परंतु त्या स्वातंत्र्याला न्याय, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेने समृद्ध करणे ही आपल्या पिढीची ऐतिहासिक जबाबदारी आहे. आपल्या प्रत्येक जबाबदार कृतीतून संविधानिक मूल्यांना बळ मिळाले, तर स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाला खरी आदरांजली मिळेल. तिरंगा सदैव उंच फडकत राहो, भारतीय लोकशाही अधिक बळकट होत राहो, संविधानिक मूल्यांचा प्रकाश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचो आणि भारत अधिक समतामूलक, न्याय्य, सक्षम व मानवी राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहो, हीच स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र प्रसंगी मनःपूर्वक शुभेच्छा.

– डॉ. राजेंद्र बगाटे

# स्वतंत्र भारतासमोरील आव्हाने व आम्ही भारतीय

**भारताला** स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे पूर्ण होऊन भारत ८०व्या वर्षात पदार्पण करीत आहे.जगात एकमेव असे राष्ट्र आहे की, ज्याचे स्वातंत्र्य इतक्या दिवस अबाधितपणे टिकून आहे.पण खरी कसौटी येथून पुढे आहे. देशासमोर या दशकात अनेक संकटे आली, येत आहेत, व येणार आहेत,याचे भान सर्वांनी ठेऊन अत्यंत जागरूक व देशाप्रती एकनिष्ठ राहण्याची नितांत गरज आहे. भारत मातेच्या स्वातंत्र्य प्रित्यर्थ ज्या महान वीरांनी,देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे.त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे पदोपदी

स्मरण करून देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.आज देशाची सर्वच क्षेत्रात झालेली उल्लेखनीय प्रगती, विकास,उन्नती हे सर्व जगातील इतर राष्ट्रांच्या डोळ्यात खुपत आहे.देशातील व्यवस्थित घडी विस्कळीत कशी होईल यासाठी शेजारी, पाजारीचे राष्ट्र व जगातील ईतर बडे राष्ट्र छुप्या कारवाया करीत आहे.आमच्या देशातील काही नागरिकाना हाताशी धरून देशात अंतर्गत बंडाळी माजवण्याचा प्रयत्न करीत आहेत. देशाच्या सिमेवर कुरापती काढून परिस्थिती बिघडवीत आहेत.भारताची प्रगती कशी रोखता येईल या साठी ही काही देश काड्या करीत आहेत.देशातील काही विघ्नांसंतोषी देशाचे नागरिक ही परकीयांच्या आमिषाला बळी पडून देशाशी बेईमानी करीत आहेत. त्यानी देश हिताला प्राधान्य द्यावयास हवे.देश प्रथम हे तत्व मानायला हवे .देशात जे वेगवेगळ्या क्षेत्रात घोटाळे सुरू आहेत तेही थांबविण्यासाठी सर्वांनी एकत्र यावयास हवे.आज देशातील तरुणाई मोठ्या प्रमाणात विचलित आहे.त्यांनी आपल्या मनावर व कृतीवर संयम ठेवावा. या देशाचे खरे आधारस्तंभ आजचे युवक आहेत. त्यांनी देशाच्या सक्षम बांधणीसाठी आपले, ज्ञान, माहिती, बळ व कौशल्य लावावे असे वाटते.देशासमोर बेकारी, देशासमोर महागाई, देशासमोर शेजारील राष्ट्रानी काड्या करणे, अतिरेकी उपद्व्याप, देशात वाढत असलेला भ्रष्टाचार, देशातील भोंदूगिरी, आपापसात कलह, शेतकरी समस्या व प्रश्न, विकासात येणारे अडथळे, देशातीलच अधिकारी व पदाधिकारी यांची ढासळत असलेली निष्ठा, कर्तव्य अशा किती तरी समस्या आ वासून उभ्या आहेत. या सर्वांवर मात करण्यासाठी देशभक्ती जागविण्यासाठी, हर घर तिरंगा-घर, घर तिरंगा, वंदे मातरम राष्ट्रीय गीत व विविध उपक्रमांच्या माध्यमातून देशातील नागरिकांना संघटित करून राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती, कर्तव्यात प्रामाणिकता, सामाजिक समानता, एकता व राष्ट्रप्रेम जागविण्याच्या या उपक्रमात सहभागी होऊन भारताच्या सर्वांगीण विकासात सर्वांनी सहकार्य करावे व एकसंघ भारत टिकवावा अशी अपेक्षा.

– धोंडीरामसिंह राजपूत

# तिरंगा उंच आहे : पण आपल्या लेकरांच्या स्वप्नांचे काय?

**१५ ऑगस्ट** भारताच्या स्वातंत्र्याचा दिवस! आकाशात डौलाने फडकणारा तिरंगा, ओठांवर राष्ट्रगीत, हातात झेंडा आणि मनात देशभक्तीचा अभिमान. हा दिवस प्रत्येक भारतीयाच्या हृदयात नवचैतन्य निर्माण करणारा. स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करण्याचा आणि देशाच्या भवितव्याची दिशा ठरवण्याचा हा दिवस. मात्र, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना एक प्रश्न मनाला अस्वस्थ करतो. ज्या भारतासाठी शहीदांनी रक्त सांडले, त्या भारतातील प्रत्येक तरुणाला न्याय, संधी आणि सुरक्षित भविष्य मिळते आहे का? देशाच्या सीमेवर उभा असलेला सैनिक गोठवणाऱ्या थंडीत, प्रखर उन्हात आणि मृत्यूच्या सावलीत देशाचे रक्षण करतो. कारगिलच्या रणभूमीवर आपल्या मातीसाठी लढताना अनेक जवानांनी हसत हसत मृत्यूला कवटाळले. त्यांच्या छातीवर लागलेल्या गोळ्या केवळ त्यांच्या शरीराला भेदून गेल्या नाहीत, तर त्या प्रत्येक भारतीयाच्या हृदयात कायमच्या कोरल्या गेल्या. कॅप्टन विक्रम बत्रा, लेफ्टनंट मनोज कुमार पांडे, ग्रेनेडियर योगेंद्रसिंह यादव यांच्यासह कारगिलच्या रणांगणात शौर्याची गाथा लिहिणाऱ्या प्रत्येक वीराला या स्वातंत्र्यदिनी कोटी कोटी नमन! पण आज देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या त्यागाबरोबरच देशाच्या भवितव्याचे रक्षण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वेदनेकडेही आपण पाहिले पाहिजे.

नीटसारख्या महत्त्वाच्या परीक्षांमध्ये पेपरफुटी, अनियमितता आणि व्यवस्थेवरील प्रश्नांनी देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या मनात असुरक्षितता निर्माण झाली. वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न डोळ्यांत घेऊन वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक परीक्षा म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका नसते, तर ती त्यांच्या आयुष्याची दिशा असते. आई-वडिलांची मेहनत, कुटुंबाच्या अपेक्षा, विद्यार्थ्यांचे दिवस-रात्र केलेले कष्ट आणि भविष्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न, हे सगळे त्या एका परीक्षेशी जोडलेले असते. अशावेळी परीक्षेच्या व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले, तर विद्यार्थ्यांनी विश्वास ठेवायचा तरी कोणावर? काही विद्यार्थ्यांनी या कथित गैरप्रकारांमुळे आणि परीक्षेच्या तणावामुळे आपले जीवन संपवले, ही बाब कोणत्याही संवेदनशील समाजाला हादरवून सोडणारी आहे. एका विद्यार्थ्याचा मृत्यू म्हणजे केवळ एका कुटुंबाचा अंत नसतो तर तो देशाच्या भविष्यातील एका शक्यतेचा अंत असतो. त्या घरातील आईच्या डोळ्यांतील अश्रू, वडिलांच्या चेहऱ्यावरील पोकळी आणि भावंडांच्या मनातील कायमची जखम कोणतीही भरपाई भरून काढू शकत नाही.

आज स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आपण तिरंग्याला सलाम करतो. पण त्या तिरंग्याला खरी मानवंदना तेव्हाच मिळेल, जेव्हा या देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या कष्टावर विश्वास ठेवता येईल. मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्याचा पराभव पेपरफुटीने होणार नाही आणि प्रामाणिकपणाची किंमत भ्रष्ट व्यवस्थेपेक्षा कमी असणार नाही, अशी व्यवस्था उभी करणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे. कारगिलमध्ये सैनिकांनी शत्रूशी लढा दिला. आजच्या भारतात तरुणाई एका वेगळ्या संघर्षाला सामोरी जात आहे. स्पर्धेचा, बेरोजगारीचा, परीक्षेच्या तणावाचा आणि व्यवस्थेवरील कमी होत चाललेल्या विश्वासाचा.

सीमेवरचा जवान देशाच्या भूभागाचे रक्षण करतो; तर विद्यार्थी देशाच्या भविष्याचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे शहीद जवानांच्या बलिदानाइतकीच विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचीही किंमत आपण ओळखली पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे भीतीपासून मुक्ती. अन्यायापासून मुक्ती. भ्रष्टाचारापासून मुक्ती. भेदभावापासून मुक्ती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आपल्या कष्टाचे फळ आपल्याला मिळेल, या विश्वासाने जगण्याचे स्वातंत्र्य!

आज देशातील लाखो पालक आपल्या मुलांना मोठे करण्यासाठी आयुष्याची पुंजी खर्च करतात. शेतकरी आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे म्हणून कर्ज काढतो. कामगाराचा मुलगा इंजिनिअर व्हावा म्हणून आई-वडील स्वतःच्या गरजा बाजूला ठेवतात. सामान्य कुटुंबातील मुलगा-मुलगी मोठ्या स्वप्नांसाठी दिवस-रात्र अभ्यास करतात. पण जर या स्वप्नांच्या मार्गात पेपरफुटी, गैरव्यवस्था आणि भ्रष्टाचार उभा राहिला, तर हा केवळ विद्यार्थ्यांवरील अन्याय नाही, तर हा देशाच्या भविष्यावरचा आघात आहे. म्हणूनच या स्वातंत्र्यदिनी सरकारने आणि संबंधित यंत्रणांनी केवळ औपचारिक शुभेच्छा देऊन थांबू नये. परीक्षा व्यवस्थेत पूर्ण पारदर्शकता, कठोर जबाबदारी आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी ही राष्ट्रनिर्मितीची गरज आहे. दोषी कोणीही असो, त्याची चौकशी निष्पक्षपणे झाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नांना उत्तरे मिळाली पाहिजेत. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, भविष्यात कोणत्याही विद्यार्थ्याला आपल्या मेहनतीवर संशय घेण्याची वेळ येता कामा नये.

५ ऑगस्टला आपण 'वंदे मातरम' म्हणतो, 'भारत माता की जय' म्हणतो. पण भारतमातेची खरी जय तेव्हा होईल, जेव्हा तिच्या लेकरांच्या डोळ्यांत भीतीऐवजी स्वप्ने असतील. जेव्हा शेतकऱ्याच्या मुलाला शिक्षणाची समान संधी मिळेल. जेव्हा गरीब आणि श्रीमंत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला समान न्याय मिळेल. जेव्हा परीक्षेतील प्रश्नपत्रिका सुरक्षित असेल आणि विद्यार्थ्यांचे भविष्यही सुरक्षित असेल. कारगिलच्या शहीदांनी आपल्या रक्ताने तिरंग्याची शान उंचावली. आजच्या पिढीने त्या तिरंग्याची प्रतिष्ठा न्याय, प्रामाणिकपणा आणि संवेदनशीलतेने जपली पाहिजे. सीमेवर शहीद झालेल्या जवानांना आपण सलाम करतो, पण परीक्षेच्या तणावात, व्यवस्थेच्या अन्यायात आणि अपयशाच्या काळोखात हरवलेल्या विद्यार्थ्यांच्या वेदनांनाही आपण विसरता कामा नये. या स्वातंत्र्यदिनी चला, एक संकल्प करूया देशभक्ती केवळ घोषणा आणि ध्वजारोहणापुरती मर्यादित ठेवणार नाही. सैनिकाच्या त्यागाचा सन्मान करू, शेतकऱ्याच्या कष्टाचा आदर करू, विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचे रक्षण करू आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवू. कारण तिरंगा केवळ आकाशात फडकत नसतो तर तो प्रत्येक भारतीयाच्या स्वाभिमानात फडकत असतो आणि त्या तिरंग्याची शपथ घेऊन आपण एवढेच म्हणूया. ज्यांनी सीमांचे रक्षण करत प्राण दिले, त्यांना विसरणार नाही. ज्यांनी शिक्षणाच्या स्वप्नासाठी आयुष्य पणाला लावले, त्यांना एकटे सोडणार नाही आणि ज्या भारतासाठी शहीदांनी रक्त सांडले त्या भारतात न्याय, समानता आणि प्रामाणिकपणाचा तिरंगा सदैव उंच ठेवू! कारगिलच्या वीर शहीदांना विनम्र अभिवादन! नीटसह विविध परीक्षांतील कथित गैरप्रकारांमुळे आणि तणावामुळे जीव गमावलेल्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! तसेच भारताच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या प्रत्येक ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीराला कोटी कोटी नमन!

**– प्रविण बागडे, नागपूर**

# महामार्गावरील अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणांवर कठोर कारवाई करा – विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

## महामार्ग सुरक्षा उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणी करून पंधरवड्याला अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) – महामार्गावरील अनधिकृत अतिक्रमणांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी मराठवाड्यातील सर्व राष्ट्रीय महामार्गाच्या लगतच्या अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणांवर तातडीने कठोर कारवाई करून ते तात्काळ हटविण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांनी आज संबंधित सर्व यंत्रणांना दिले. तसेच महामार्ग सुरक्षितेबाबत उपाययोजना राबविण्यात हयगय केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सुचित केले.

मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी राष्ट्रीय महामार्गावरील होणाऱ्या अपघात प्रकरणी दाखल सुमोटो प्रकरणात दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने आज विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजी नगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, संबंधित महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ(MSRDC), नगरपरिषद प्रशासन आणि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जी.श्रीकांत यांनी महामार्गावरील अतिक्रमणांमुळे होणारे अपघात रोखण्याच्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यांतील राष्ट्रीय महामार्गाच्या ठजथ मध्ये असलेले अनधिकृत ढाबे, हॉटेल, दुकाने आणि इतर व्यावसायिक अतिक्रमणे तातडीने हटविण्याची कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच महामार्गाच्या मुख्य मार्गावर अथवा मुख्य वाहतूक मार्गाच्या दोन्ही बाजूंना असलेली अतिरिक्त जागा(paved shoulder) वर अवजड व व्यावसायिक वाहनांचे अनधिकृत पार्किंग किंवा थांबणे रोखण्यासाठी प्रगत वाहतूक प्रणाली, जीपीएस (ATMS, GPS )आधारित छायाचित्र पुरावे आणि ई – चालाना (e-Challan ) प्रणालीचा प्रभावी वापर करण्याचे निर्देश दिले. त्याचबरोबर अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणांवर निश्चित करून कार्यवाहीत विलंब किंवा हयगय झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सूचित केले. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासन, पोलीस, राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश असलेली जिल्हा महामार्ग सुरक्षा टास्क फोर्स स्थापन करून दर पंधरा दिवसांनी आढावा बैठक घेण्याचे निर्देश देत जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः महामार्गावरील ठिकाणांची पाहणी करून अतिक्रमण हटविण्याच्या कार्यवाहीवर देखरेख ठेवण्याचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी यावेळी सांगितले. महामार्ग सुरक्षेसाठी पोलीस आणि परिवहन विभागाच्या स्वतंत्र महामार्ग देखरेख पथक स्थापन करून त्यांचा राष्ट्रीय महामार्गाच्या २४ तास गस्ती पथकाशी समन्वय साधावा. महामार्गांवरील कॅमेरे, वाहनांचा वेग मोजणारे यंत्र, चालकांसाठी माहिती व सूचना देणारे डिजिटल बोर्ड, आपत्कालीन स्थितीत मदतीसाठी महामार्गाच्या नियंत्रण कक्षास संपर्क साधण्यासाठी संपर्क क्रमांक अथवा टेलिफोन बूथ यासह प्रगत वाहतूक प्रणाली (ATMS ) अंतर्गत सर्व यंत्रणा कार्यरत असल्याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच अपघाताच्या प्रसंगी तातडीने मदत उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक ७५ किलोमीटर अंतराच्या आत प्राथमिक उपचारासाठी रुग्णवाहिका आणि रिकव्हरी क्रेन उपलब्ध असावी. त्याचप्रमाणे प्रत्येक ७५ किलोमीटर अंतरावर महामार्गाच्या बाजूला ट्रक व इतर वाहनांना थांब्यासाठी सुविधा (Truck Lay-by/Wayside Amenities) उपलब्ध करून त्यामध्ये ट्रक पार्किंग, विश्रांतीगृह, भोजन, स्वच्छतागृह आणि प्राथमिक उपचाराच्या सुविधाही उपलब्ध करून देण्याच्या सूचना करण्यात आल्या.

त्याचबरोबर अपघातप्रवण ठिकाणांची ओळख करून तेथे उच्च क्षमतेचे एलईडी, हाय मास्ट दिवे, आवश्यक रोड मार्किंग, वेग मर्यादा मोजणारे कॅमेरे तसेच चितावणी देणारे फलक बसवावेत. महामार्ग सुरक्षा क्षेत्रात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय नवीन परवाना, ना हरकत, अथवा व्यापार परवानगी देऊ नये, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या सर्व उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करून संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा जिल्हानिहाय अनुपालन अहवाल दर पंधरा दिवसांनी विहित मुदतीत विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करण्याचे निर्देशही जी. श्रीकांत यांनी यावेळी दिले.

# तिरंगा देशाची आन-बान-शान



**शहिदांच्या** आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत व्हाव्यात व नवीन पिढीला शहिदांची, क्रांतिकारकांची, थोरम हात्म्यांची आठवण निरंतर हृदयात रहावी व इतिहास जागृत रहावा यादृष्टीकोणातुन १५ ऑगस्टला प्रत्येक घरावर तिरंगा फडकवुन देशाची आन-बान-शान उंचावण्यासाठी सर्वांनीच अग्रेसर रहायला हवे. कारण तिरंगा भारतासाठी व भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी अनमोल रत्न आहे. कारण यातुनच क्रांतीची मशाल उदयास आली व १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उजाडला.यात सुर्याचा प्रखर तेजोमय प्रकाश, चंद्राची शांतीमय प्रतीमा,लखलखत्या ताऱ्यांचे प्रकाशमय वातावरण निर्माण करणे आणि वायू देवतेच्या सहवासाने विराजमान होवून देशाच्या शुरवीरांना व क्रांतिकारकांना तिरंगा सांगतो की 'मेरा देश महान'. वाढता अलनिनोचा प्रभाव,बदलते हवामान व वाढते प्रदूषण लक्षात घेता देशातील प्रत्येक राज्यांनी १५ ऑगस्टला वृक्ष लागवडीचा निर्धार करायला हवा.यामुळे १५ ऑगस्टला लावलेले वृक्ष शहिदांच्या आठवणीच्या निमित्ताने अनंत काळापर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहील व संपूर्ण भारतात आपल्याला हिरवागार गालिचा सर्वत्र दिसून येईल. १५ ऑगस्टला स्वागत करण्यासाठी आपल्याला संपूर्ण नद्यांचा खळखळाट ऐकु येईल, समुद्र देवता आपल्या लाटांच्या खुशीने स्वागत करेल अशा प्रकारे स्थल,जल,वायु देवता १५ ऑगस्टला स्वागतासाठी सज्ज आहे. देशातील वाढते प्रदुषण व दिवसेंदिवस कमी होत असलेले ऑक्सिजनचे प्रमाण यामुळे पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतु भयभीत आहे. याकरीता १५ ऑगस्टचे औचित्य साधून देशातील प्रत्येक राज्यांनी १५ ऑगस्टला झाडे लावण्याचा संकल्प करावा. कारण वृक्षलागवडीमुळे देशातील वातावरण प्रफुल्लित होईल व आपले पुर्वज आशिर्वाद देतील आणि त्यांना अभिमान होईल की स्वतंत्र भारतात सर्वकाही ठीक आहे. वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मदत होईल.आपल्या पुर्वजांनी अनेक कठीण प्रसंगांशी सामना करत १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.आज भारताला स्वतंत्र होऊन ७९ वर्षे पूर्ण होत आहे त्यानिमित्त्याने देशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.त्या अनुषंगाने संपूर्ण भारतात जय्यत तयारी सुरू आहे.ही अत्यंत आनंदाची व स्वागतार्ह बाब आहे.देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक थोर महात्मे, क्रांतिकारक, जहालवादी नेते, मवाळवादी नेते यांच्या एकसुत्री कार्यक्रमाने व बलीदानाने १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेतो आहे.त्याकाळी स्वातंत्र्यासाठी घरा-घरातुन आवाज बुलंद व्हायचा व स्वातंत्र्यासाठी संघर्षमय वातावरण निर्माण करून संपूर्ण युवावर्ग इंग्रजांशी लोहा (टक्कर) घेण्यासाठी काहीही करायला तयार रहायचे. आज आपल्याला आपल्या क्रांतिकारकांचे, शहिदांचे, थोरम हात्म्यांचे अनुकरण करून त्यांनी मिळवून दिलेल्या स्वातंत्र्याची आठवण म्हणून आणि देश स्वतंत्र होऊन ७९ वर्षे पूर्ण होत असल्याचे पाहून प्रत्येकांनी १५ ऑगस्टला आप-आपल्या घरावर तिरंगा फडकवीलाच पाहिजे असा प्रण देशाच्या १४५ कोटी जनतेनी घेतला पाहिजे. असे जर झाले तर तिरंगा एवढ्या उंचावर गेलेला आपल्याला दिसेल की संपूर्ण जग आश्चर्य चकित होईल व म्हणतील खरोखरच भारत देश महान. कारण जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी अनेक धर्माचे, पंथाचे,जातीचे व संस्कृतीचे लोक एकोप्याने रहातात. जेव्हा देशाच्या एकतेचा आणि अखंडतेचा प्रश्न येतो तेंव्हा-तेव्हा एकनिष्ठेने कार्य करतात. त्यामुळे भारतातील १४५ कोटी जनता आपापल्या घरावर तिरंगा फडकवून जगाला आपली ऐकता अवश्य दाखवेल. कारण भारतातील छोटे-मोठे सर्वच जाणतात की देश स्वतंत्र करण्यासाठी शुरविरांना, क्रांतिकारकांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या, बलिदान द्यावे लागले, फासावर जावे लागले, घर-दार सोडावे लागले तेव्हाच भारत स्वतंत्र झाला. आपण शुरविरांना, क्रांतिकारकांना, थोरमहात्म्यांना सुईच्या टोकायेवढीही मदत करू शकत नाही. परंतु १५ ऑगस्टला प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन आपल्या पुर्वजाच्या आठवणी ताज्या करू शकतो. आजही प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यात आपल्या पुर्वजांच्या आठवणी आहेत व स्वाभिमान आहे यात दुमत नाही. कारण जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत भारत भुमितील प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्यवीरांना, शहिदांना, क्रांतिकारकांना, थोरम हात्म्यांना आपल्या काळजात ठेवून स्मरणात ठेवील. आपले पुर्वज आपल्याला कुठुनतरी अवश्य पहात असेलच त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ प्रत्येकांनी आपापल्या घरावर तिरंगा फडकवुन शहिदांना स्मरण केले पाहिजे.देश स्वतंत्र होऊन ७९ वर्षे झालीत.परंतु भारत भ्रष्टाचार मुक्त झाला नाही याचे दुःख आहे.देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत व याचे प्रायश्चित्त युवा पिढी व आबालवृद्ध भोगत आहेत.यामध्ये ढासळती शिक्षण प्रणाली, महागाई,शेतकऱ्यांच्या समस्या, पर्यावरणाची समस्या, बेरोजगारी, आरोग्य विभाग, अन्नधान्य विभागातील खाद्यपदार्थातील भेसळ या संपूर्ण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याने देशातील जनता व जेन-झी अत्यंत त्रस्त आहे. त्यामुळे सरकारला माझी विनंती आहे की, स्वतंत्र दिनाचे औचित्य साधून भारत भ्रष्टाचार मुक्त करण्याचा संकल्प सरकारने,पक्ष-विपक्षांनी व राजकीय पुढाऱ्यांनी घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे स्वतंत्र दिनाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन वाढत्या प्रदूषणावर मात करण्याचा संकल्प केला पाहिजे.यामुळे प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात आपल्याला क्रांतिकारकांचे दर्शन अवश्य होईल.आज देशाची स्थल सेना, वायुसेना, नौसेना तिरंग्याचा स्वाभिमान अबाध्य रहावा यासाठी अग्रेसर असुन अहोरात्र देशाच्या सुरक्षेसाठी तत्पर दिसून येतात. त्यामुळेच देशाची १४५ कोटी जनता सुरक्षित असुन मोकळा श्वास घेत आहे. तिरंगा देशासाठी व देशातील सिमावर्ती भागातील संपूर्ण सैनिकांसाठी व कानाकोपऱ्यातील भारतीयांसाठी भारतमातेचा आत्मा आहे.जय हिंद!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार)

# श्रावण महिना कालावधीत वेरुळ गावात वाहन बंदी

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (प्रतिनिधी) – श्रावण मासानिमित्त वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर महादेव मंदिरात शनिवार, रविवार व सोमवार या दिवशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. या काळात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी व भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वेरूळ येथील भगवान महावीर चौक ते मालोजीराजे भोसले चौक हा रस्ता ठराविक कालावधीत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद (नो व्हेईकल झोन) ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी मोटार वाहन कायदा कलम ११५ अन्वये निर्गमित केले आहेत.

श्री घृष्णेश्वर महादेव मंदिर हे धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-एच लगत असून या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. श्रावण महिन्यात भाविकांची संख्या वाढत असल्याने तसेच वेरूळ गावात पुरेशी पार्किंग सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहने उभी केली जातात. परिणामी वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांब रांगा लागतात. त्यामुळे अपघाताची शक्यता निर्माण होण्यासह भाविकांना मंदिरापर्यंत जाण्यास अडचणी निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर दि.१४ ते १८ ऑगस्ट, दि.२१ ते २५ ऑगस्ट, दि.२८ ऑगस्ट ते १ सप्टेंबर आणि दि.४ ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत रात्री ८ वाजेपासून दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत वेरूळ येथील भगवान महावीर चौक ते मालोजीराजे भोसले चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद (नो व्हेईकल झोन) राहणार आहे.

भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी भगवान महावीर चौक व मालोजीराजे भोसले चौकाच्या पलीकडे वाहनांच्या पार्किंगसाठी मोकळी जागा व पार्किंग व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे श्री घृष्णेश्वर महादेव मंदिर परिसर व वेरूळ गावातून जाणारा रस्ता मोकळा राहून भाविकांना विनाअडथळा मंदिरापर्यंत जाता येणार आहे.

मोटार वाहन कायदा कलम ११५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य किंवा केंद्र शासनाच्या मालकीची वाहने तसेच पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका व अन्य अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या आदेशातून वगळण्यात आले आहे.

श्रावण मासानिमित्त वेरूळ येथे येणाऱ्या भाविक व वाहनधारकांनी वाहतूक व्यवस्थेतील बदलाची नोंद घेऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# नांदेड विभागात ऑपरेशन यात्री सुरक्षा आणि ऑपरेशन अमानत अंतर्गत उल्लेखनीय कार्य

नांदेड, दि. १४ (प्रतिनिधी) – प्रवाशांच्या सुरक्षिततेसह त्यांची हरवलेली मालमत्ता सुरक्षितपणे परत मिळवून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' आणि 'ऑपरेशन अमानत' अंतर्गत रेल्वे सुरक्षा दल आणि संबंधित सुरक्षा यंत्रणांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत प्रवाशांचे सामान चोरी करण्याचा प्रयत्न करणारा संशयित आरोपी ताब्यात

दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी सुमारे १४:३० वाजता छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर गाडी क्रमांक १२७१५ सचखंड एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान गुन्हेगारांविरुद्ध संयुक्त निगराणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत CIB-D&I/छत्रपती संभाजीनगर, CIB-D&L/नांदेड, CIB-D&V/नांदेड, छत्रपती संभाजीनगर पोस्ट तसेच लोहमार्ग पोलीस /छत्रपती संभाजीनगर येथील कर्मचाऱ्यांच्या संयुक्त पथकाने कारवाई केली. पथकाने प्रवाशांच्या चढ-उताराच्या वेळी गाडीच्या मागील सामान्य द्वितीय श्रेणी (GS) डब्यात प्रवाशांचे सामान चोरी करण्याचा तसेच पाकिटमारीचा प्रयत्न करणाऱ्या एका संशयित TOPB आरोपीला ताब्यात घेतले.

ताब्यात घेण्यात आलेल्या संशयिताची ओळख गणेश चव्हाण जि. जळगाव, महाराष्ट्र अशी झाली.

आरोपीस लोहमार्ग पोलीस/छत्रपती संभाजीनगर कार्यालयात आणण्यात आले असून त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११० आणि ११७ अन्वये NCR क्रमांक ७१/२०२६ दि. १२.०८.२०२६ नोंदविण्यात आला आहे.

ऑपरेशन अमानत अंतर्गत प्रवाशाची हरवलेली बॅग सुरक्षितपणे शोधून परत

दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे २३:२७ वाजता DSCR/नांदेड येथून RMC Reference No. 2026081111369 प्राप्त झाला. त्यामध्ये गाडी क्रमांक ५७६५१ नांदेड-मनमाड पॅसेंजरने प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाची बॅग सेलू रेल्वे स्थानक पार झाल्यानंतर गाडीत राहिल्याची माहिती देण्यात आली होती.

माहिती मिळताच ड्युटीवरील हेड कॉन्स्टेबल-२२५ श्री सुरेश खिल्लारे यांनी तात्काळ शोधमोहीम सुरू केली आणि प्रवाशाची बॅग सेलू रेल्वे स्थानकावर शोधून काढली. बॅग सुरक्षितपणे RPF आउट पोस्ट, सेलू येथे आणण्यात आली आणि प्रवाशाशी संपर्क साधून बॅग सापडल्याची माहिती देण्यात आली.

दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रवासी श्री पद्मला वेंकटेश्वरलु, वय ६० वर्षे, रा. खम्मम, आंध्र प्रदेश, RPF आउट पोस्ट सेलू येथे उपस्थित झाले. आवश्यक कायदेशीर कार्यवाही पूर्ण केल्यानंतर शोधून काढलेली बॅग त्यांना योग्य ओळख आणि पावतीसह सुरक्षित अवस्थेत परत करण्यात आली. प्रवाशाने रेल्वे सुरक्षा दलाने केलेल्या तत्पर कारवाईबद्दल आणि सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

दक्षिण मध्य रेल्वेचा नांदेड विभाग प्रवाशांची सुरक्षा आणि त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी सतत सतर्कता आणि प्रभावी कार्यवाही करत आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# युवाशक्तीच्या योगदानातून विकसित भारत घडेल; मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करु-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- युवाशक्तीचे नवसंशोधनात मोठे योगदान आहे. त्या सामर्थ्यावर उद्याचा विकसित भारत, विकसित महाराष्ट्र घडेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आपला देश बलशाली व संपन्न देश म्हणून जगात लौकीक प्राप्त करीत आहे. मराठवाडा सुद्धा सुजलाम सुफलाम करुन दुष्काळमुक्त करु, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत महात्मा जोतिबा फुले पुतळा संभाजीपेठ ते क्रांती चौक दरम्यान आयोजित भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यात मुख्यमंत्री फडणवीस सहभागी झाले होते. या रॅलीत राज्याचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इमाव कल्याण मंत्री अतुल सावे, रोहयो व पणन मंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खा. अशोक चव्हाण, खा.स्मिता वाघ, आमदार रवींद्र चव्हाण, आ. प्रशांत बंब, आ. अनुराधा चव्हाण, आ.मंगेश चव्हाण, आ. राम भदाणे तसेच महापौर समीर राजुरकर आदी मान्यवर तसेच उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यातील लोकप्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिवादन केले. त्यानंतर रॅलीस सुरुवात झाली. रॅलीचा समारोप क्रांती चौकात झाला. तेथे उपस्थित जनसमुदायास संबोधित करतांना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, तिरंगा आमची आन बान आणि शान आहे. ह्या तिरंग्यासाठी हजारो लोकांनी बलिदान दिले. हा तिरंगा हिच आमची खरी ओळख आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी संदेश दिला, ९ ते १५ ऑगस्ट पर्यंत तिरंगा यात्रा काढून देशप्रेमाने ओत प्रोत मातृभुमिचे दर्शन घडवू. त्यानुसार आज हा जनसमुदाय तिरंग्याच्या प्रेमासाठी एकत्र आला आहे.आज छत्रपती संभाजीनगर मध्ये तिरंगा रॅली गर्दीचे रेकॉर्ड तोडले, तिरंग्याचे वादळ मला दिसते आहे,अशा शब्दात त्यांनी छत्रपती संभाजीनगरवासियांचे कौतुक केले.

श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात गेल्या दशकात देशाला प्रगतीपथावर नेले. जगात बलशाली देश म्हणूनओळख निर्माण झाली,जगात ४ थ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून स्थान निर्माण केलं.आपल्या राज्याची अर्थ व्यवस्था ५० लाख कोटी पर्यंत नेली. देश बदलतोय, राज्य बदलतंय, मराठवाडाही बदलतोय.आमचा संकल्प आहे मराठावाड्याच्या पुढच्या पुढील दुष्काळ पाहू देणार नाही. कोकणातून समुद्रात वाहून जाणारे पाणी उजनी मार्गे मराठवाड्यात आणून इथला भाग सुजलाम सुफलाम करू.आपण तिसरी स्टार्ट अप इको सिस्टीम तयार केली. त्यात तरुणाई चे योगदान मोठे आहे. नव संशोधनात तरुणाई अग्रेसर आहे. त्याबळावरच आपला भारत विकसित भारत म्हणून वाटचाल करीत आहे,असा संदेश त्यांनी दिला.

श्री, फडणवीस म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला सर्वोत्तम संविधान दिलं. आपल्या हक्का सोबत कर्तव्य लक्षात ठेवावी आणि उत्तम नागरिक बनावे,असे उत्तम नागरिक बनून समाजाची ताकद बना.आपल्या मराठवाड्याला देशापेक्षा १३ महिने उशिरा स्वातंत्र्य मिळालं. निजामच्या राजवतीतून मोकळा श्वास घेण्यासाठी हजारो देशभक्तांनी बलिदान दिलं. त्यांचे स्मरण आपण करू. आज आपण एकप्रतिज्ञा करू. आपल्या देशासाठी,राज्यासाठी समाजासाठी जगू. सभास्थानी प्रारंभी वंदेमातरम, राज्यगीत झाले व राष्ट्रगीताने सभेचा समारोप झाला. या रॅलीत मोठ्या संख्येने स्वातंत्र्य सैनिक, राजकीय सामाजिक कार्यकर्ते, युवक, युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीत सहभागी विविध कलापथक, ढोल लेझीम पथकांनी , संबळ वाद्य पथकांनी लक्ष वेधून घेतले.देशभक्तीपर घोषणांनी रॅली मार्गाचा परिसर दुमदुमून गेला होता.

## ख्रिस्ती कृती समिती महाराष्ट्र यांचा राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग आंदोलनास सक्रिय पाठिंबा




छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- शाश्वत मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने ज्येष्ठ आरक्षण अभ्यासक राजेंद्र दाते पाटील विभागीय आयुक्तालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत. शुक्रवारी सहाव्या दिवशी ख्रिस्ती कृती समिती महाराष्ट्र यांनी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग आंदोलनास सक्रिय पाठिंबा दिला असुन त्यांची बिघडती प्रकृती पाहता शासनाने तात्काळ दखल घ्यावी नसता आम्ही सुद्धा संख्येने आंदोलनात सहभागी होऊ असा इशारा ख्रिस्ती कृती समिती महाराष्ट्र यांचे वतीने विजय गुड्डू निकाळजे यांनी दिला असुन या पाठिंबा देण्याच्या कार्यक्रमास शेकडो ख्रिस्ती बांधव उपस्थित होते त्यात रेव्ह. डॉ अब्राहम घुमारे, फादर विजय पांढरे, रेव्ह नितीन गायकवाड, पास्टर वसंत नाडे, पास्टर संदीप खेत्रे,पास्टर राजु भंडारी,पास्टर विनोद नवगिरे, पास्टर शिलास मोरे,सदानंद घोरपडे, ब्रदर सॅमसंग जॉनसन श्रीसुंदर,रेव्ह ताकवलेअशी अनेक मान्यवर व समाज बांधव उपस्थित होते.

मराठा आरक्षणाची शासनाने भूमिका स्पष्ट करावी, एसईबीसी प्रवर्गाला ओबीसी प्रमाणे शिक्षण, नोकरी, शिष्यवृत्ती, शुल्क सवलत व शासकीय योजनांचा लाभ द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेणे, सारथी संस्थेला पाच हजार कोटी,अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला दहा हजार कोटी रुपयांचा निधी देणे, प्रलंबित उमेदवारांना तातडीने नियुक्त्या देणे आणि कायगाव येथे मराठा हुतात्मा स्मारक उभारणे, या मागण्या बाबत ख्रिस्ती कृती समितीने जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग उपोषणास पाठिंबा दिला आहे.या प्रसंगी मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देत विकसित भारताचा संकल्प पुढे नेण्याची गरज-केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे

### 'स्वदेशी एक्स्पो २०२६'चे श्रीमती खडसे यांच्या हस्ते उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. देशातील कला, हस्तकला व पारंपरिक कारागिरीला योग्य व्यासपीठ मिळाले, तर त्यातून कलाकारांना रोजगाराच्या संधी मिळतील व स्वदेशी अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. प्रत्येकाने स्वदेशी उत्पादनांचा अधिकाधिक वापर करून देशाच्या विकासात योगदान द्यावे. स्वदेशीला प्रोत्साहन देत आपण सर्वांनी एकत्रितपणे विकसित भारताचा संकल्प पुढे नेला पाहिजे, असे आवाहन केंद्रीय क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले.

केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय व शिखाज् कारागिरी संस्थेच्यावतीने सागर रिसॉर्ट, एमआयडीसी येथे आयोजित 'स्वदेशी एक्स्पो २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी आमदार अनुराधा चव्हाण, सेवानिवृत्त सचिव सुमंत भांगे, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू विलास सपकाळ, केंद्रीय सूचना प्रसारण मंत्रालयाचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी संतोष देशमुख, कैलास अजमेरा, संतोष अजमेरा, शिखा अजमेरा, विवेक देशपांडे आदी उपस्थित होते.

श्रीमती खडसे म्हणाल्या, तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात भारतीय कला व संस्कृतीचे आधुनिक स्वरूपात सादरीकरण करणे आवश्यक आहे. आपल्या कला व स्वदेशी उत्पादनांचा देशात व जगभर प्रचार करण्याची जबाबदारी भारतीय म्हणून आपलीच आहे. पारंपरिक कलेला आधुनिक रूप, प्रभावी प्रचार-प्रसार व योग्य बाजारपेठ मिळाल्यास ती नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचू शकते.

पारंपरिक कलेमागील इतिहास, कलाकारांची मेहनत व उत्पादनाचे वैशिष्ट्य समजून घेऊन नागरिकांनी अशा कलाकृतींना प्रोत्साहन दिले पाहिजे. कलेचे आधुनिक रूपांतर, प्रभावी विपणन व योग्य बाजारपेठ यांच्या माध्यमातून चांगले व्यवसाय प्रारूप उभे राहू शकते. मात्र, या प्रक्रियेत पारंपरिक कलाकार व त्यांच्या कलेचे जतन करणे तितकेच महत्त्वाचे आहे. कलाकार ही देशाची खरी ताकद असून, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे व त्यांची कला लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

आमदार अनुराधा चव्हाण म्हणाल्या, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार देशातील लोककला, हस्तकला व पारंपरिक कारागिरी जतन करण्यासोबत स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. युवक व महिला उद्योजकांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन नवउद्योजकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

केंद्र शासनाच्या माध्यमातून युवक, महिला व उद्योजकांना सातत्याने प्रोत्साहन व सहकार्य मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. शिखा अजमेरा म्हणाल्या, कारागीर, उद्योजक आणि ग्राहक हे कलेच्या विकासातील तीन महत्त्वाचे घटक आहेत. स्थानिक कलाकारांच्या मेहनतीचा सन्मान करून त्यांच्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्याचे काम या प्रदर्शनातून होणार आहे. विवेक देशपांडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी केंद्र शासनाच्या केंद्रीय संचार विरो माहिती व प्रसारण मंत्रालयाचे पंजीकृत लोकजागृती बहुउद्देशीय सांस्कृतिक कला सेवाभावी संस्था यांच्या पथकाने गणेशवंदना व महाराष्ट्र गीतांचे सादरीकरण केले.

हे प्रदर्शन दि. १४ ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत तीन दिवस चालणार असून, देशभरातून ७५ हून अधिक प्रदर्शक सहभागी झाले आहेत.

नागरिकांसाठी प्रदर्शनात प्रवेश विनामूल्य आहे. या प्रदर्शनातील ७५ टक्क्यांहून अधिक प्रदर्शक हे महिला उद्योजक व लघुउद्योगांचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## स्वदेशी एक्स्पो २०२६ मध्ये भारतीय हस्तकला, हातमाग वस्त्र दालनांची अप्रतिम कलाकुसर !



छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- भारतीय संस्कृती, परंपरा आणि कारागिरांच्या कौशल्याचा समृद्ध वारसा एकाच छताखाली अनुभवण्याची संधी देणाऱ्या 'स्वदेशी एक्स्पो २०२६' मध्ये भारतीय हस्तकला व हातमाग वस्त्रांच्या विविध दालनांची अप्रतिम कलाकुसर नागरिकांसाठी उपलब्ध झाली आहे. १४ ते १६ ऑगस्ट या तीन दिवस चालणाऱ्या प्रदर्शनास पहिल्या दिवशी चोखंदळ ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

केंद्रीय सूक्ष्म, मध्यम व लघु उद्यम मंत्रालयाच्यावतीने छत्रपती संभाजीनगरच्या एमआयडीसी चिकलठाणा येथील सागर रिसॉर्टमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनात, देशाच्या विविध भागांतून आलेल्या कारागिरांनी आणि विणकरांनी तयार केलेल्या आकर्षक वस्तूंचे प्रदर्शन ग्राहकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. या स्वदेशी एक्स्पोचे केंद्रीय क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्रीमती खडसे यांच्यासह उपस्थित आमदार अनुराधाताई चव्हाण व इतर मान्यवरांनी प्रदर्शनातील प्रत्येक स्टॉलला भेट देत उत्पादनांची माहिती जाणून घेतली.

महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांच्या पारंपरिक कलांना व वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला आहे. हातमागावर विणलेल्या वस्त्रांमागील कारागिरांचे कौशल्य, पारंपरिक तंत्रज्ञान आणि स्थानिक संस्कृतीची झलक या दालनांमधून अनुभवता येते.

आपल्या घरी येणाऱ्या पाहुण्यांना वेगळ्या पद्धतीचे गिफ्ट देण्याची अभिरुची ठेवणाऱ्यांसाठी हा 'एक्स्पो ' पर्वणी ठरणारा आहे.जिल्हा प्रशासनाने केंद्रशासनाच्या मदतीने सुरू असलेल्या या स्वदेशी 'एक्सपो 'ला मोठ्या संख्येने भेट देण्याच्या आवाहन केले आहे.१४, १५ व १६ ऑगस्ट या काळात नागरिकांनी सहकुटुंब या ठिकाणी सहभागी व्हावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

महिला उद्योजक, स्वयंसहाय्यता गट, ग्रामीण कारागीर आणि पारंपरिक कलाकारांनी तयार केलेल्या उत्पादनांनाही एक्स्पोमध्ये स्थान देण्यात आले आहे. पारंपरिक हातमागावरील साड्या, ड्रेस मटेरियल, शाली, दुपट्टे, कापडांच्या विविध प्रकारांसह कलात्मक हस्तकला वस्तू येथे पाहता व खरेदी करता येत आहेत. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार स्वदेशी उत्पादने खरेदी करण्याबरोबरच स्थानिक व पारंपरिक कारागिरांना थेट बाजारपेठ उपलब्ध होत आहे.

भारतीय हस्तकला व हातमाग उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे, कारागिरांच्या कलाकौशल्याला प्रोत्साहन देणे आणि नागरिकांमध्ये स्वदेशी वस्तूंचा अधिकाधिक वापर वाढवणे, हा एक्स्पोचा प्रमुख उद्देश आहे. विविध राज्यांतील पारंपरिक कला, वस्त्रे आणि हस्तकला यामुळे एक्स्पोला भेट देणाऱ्या नागरिकांना भारताच्या विविधतेतील सांस्कृतिक समृद्धीचा अनुभव मिळत आहे. या प्रदर्शनामध्ये ७५ हून अधिक प्रकारची दालने थाटण्यात आली आहेत. ओडिशाची 'पट्टाचित्र' कला, राजस्थानची विलोभनीय 'पिचवाई' कलाकृती, झारखंडची पारंपरिक व वैशिष्ट्यपूर्ण 'सोहराई' कला, बिहारच्या मधुबनीची 'मधुबनी' कला, पाटण्याची टिकुली पेंटिंग, उत्तराखंड-हिमालयाची पारंपरिक 'ऐपण' कला, सुंदर हस्तकला आणि महाराष्ट्राची शान असलेल्या अस्सल 'पैठणी'ने ग्राहकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. स्वदेशी एक्स्पोमध्ये खरेदीसोबतच विविध कलांचे प्रत्यक्ष दर्शन, कलाकारांशी संवाद आणि पारंपरिक उत्पादनांच्या निर्मितीची माहिती घेण्याची संधीही उपलब्ध असल्याने नागरिकांनी या उपक्रमाला भेट देऊन भारतीय कारागिरांच्या कलाकौशल्याला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME
FROM (OLD NAME)
SURAIYA
TO (NEW NAME)
SURAYYA KHAN NISAR KHAN
AS PER MY DOCUMENTS
ADD: PLOT N 22 B, MOTIWALA NAGAR NEAR
MGM HOSPITAL AURANGABAD. 431001

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME
FROM (OLD NAME)
1) KHAN TARANNUM
2) KHAN TARANNUM NISAR
TO (NEW NAME)
TARANNUM KHAN NISAR KHAN
AS PER MY DOCUMENTS
ADD: PLOT NO. 22 B, MOTIWALA NAGAR NEAR
MGM HOSPITAL AURANGABAD. 431001

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई - ४०० ०३२.**

## सूचना

**दिनांक : १४.०५.२०२६**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६**

**क्र.टिपीएस-३०२५/९६८/प्र.क्र.१७२/२०२५/नवि-३०:-** ज्याअर्थी, छत्रपती संभाजीनगर मूळ हद्द (दुसरी सुधारित) + वाढीव हद्द (पहिली सुधारित) + सातारा, देवळाई + सिडको/सिडको निर्धीसुचित क्षेत्र + चिकलठाणा MIDC, जि. छत्रपती संभाजीनगर क्षेत्राची विकास योजना (यापुढे 'उक्त विकास योजना' असे संबोधिले आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यापुढे 'उक्त अधिनियम' असे संबोधिले आहे) चे कलम ३१ चे उप कलम (१) अन्वये शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-३०२५/प्र.क्र.६/२०२५/भागशः मंजूरी/नवि-३०, दि.१५.०४.२०२५ अन्वये भागशः मंजूर केली आहे. (यापुढे 'उक्त विकास योजना' असे संबोधिले आहे)

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजे नक्षत्रवाडी येथील गट क्र. ११३ (पै.) (यापुढे 'उक्त जमिन' असे संबोधिले आहे) या जागेवर 'आरक्षण क्र .X/६८-FB', प्रस्तावित आहे (यापुढे 'उक्त विकास योजना प्रस्ताव' असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील उक्त जमिनीवरील 'आरक्षण क्र.X/६८-FB' हे आरक्षण वगळून आरक्षणातून मुक्त होणारे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणे (यापुढे 'उक्त फेरबदल' असे संबोधले आहे) आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१ क क) (क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तनुषंगिक शक्तींचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, विभागीय सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना, प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

**०२.** विभागीय सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, एम.बी. सी. टॉवर, दुसरा मजला, बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर- ४३१००१, यांचेकडे, सदर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालमर्यादेत उक्त फेरबदलाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचना स्विकारुन विर्चीाण्यात येतील.

**०३.** उक्त फेरबदल दर्शविणारी प्रस्तूत सूचना / भाग नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी उपलब्ध राहिल.

१. आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
२. विभागीय सहसंचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
३. सहायक संचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर शाखा, छत्रपती संभाजीनगर.

सदरची सूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,**

**स्वाक्षरीत/ -**
**(प्रसाद रा. शिंदे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

---

**Government of Maharashtra**
**Urban Development Department**
**4th Floor Main Building, Mantralaya,**
**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**
**Mumbai-400 032**

## NOTICE

**Date: 14.05.2026**

**The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

**No.TPS-3025/968/CR-172/2025/UD-30:-** Whereas, the Government in Urban Development Department vide its Notification No.TPS-3025/CR-06/2025/Part-Sanction/UD-30, dated the 15.04.2025 has partly sanctioned the Development Plan of Chhatrapati Sambhajinagar, Original Boundary (Second Revised) + Extended Limit (First Revised) + Satara Deolai + CIDCO / CIDCO Denotified Area + Chikhalthana MIDC, Dist. Chhatrapati Sambhajinagar (hereinafter referred to as "the said Development Plan") under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, the land bearing Survey No.113 (Pt.) of Village Nakshtrawadi (hereinafter referred to as "the said Land") is reserved as "Site No.X/68-FB" (hereinafter referred to as "the said Development Plan Proposals");

And whereas, the Government is of opinion that, it is necessary to delete the said land from "Site No.X/68-FB" and include the land so released in Residential Zone (hereinafter referred to as "the said Modification");

Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(1AA) (A) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes this Notice for inviting Suggestion / Objection from the general public in respect of the said Modification. Any objections/suggestions upon the said Modification, shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this Notice in Official Gazette to the Divisional Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division who is hereby authorized as an Officer to hear objections/suggestions and say of concerned Planning Authority, as applicable, and submit his report to the Government.

**02.** Only the suggestions and / or objections regarding the said Modification, that may be received by the Divisional Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, having his office at M.B.C. Tower, Second Floor, Near Baba Petrol Pump, Adalat Road, Chhatrapati Sambhajinagar-431001, within the stipulated period of one month from the date of publication of this Notice in the Official Gazette, shall be considered.

**03.** Copy of the said Notice along with the plan showing the said Modification shall be made available for inspection to general public at the following offices during office hours on all working days.

1) The Commissioner, Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation, Chhatrapati Sambhajinagar.
2) The Divisional Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar.
3) The Assistant Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Branch, Chhatrapati Sambhajinagar.

This Notice shall also be made available on the Government website www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**Sd/-**
**(Prasad R. Shinde)**
**Under Secretary to Government**

विमाका/छत्रपती संभाजीनगर/जाहि/१०३/२०२६-२७